सन २०१७-१८ करीता इको टुरि झम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण. (२४०६ २२९५)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : निसप-२०१७/ प्र.क्र.११४ (भाग-१)/फ- ५
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २७ सप्टेंबर, २०१७

वाचा - १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२६/८२५/२०१७-१८,दि. २४/७/२०१७.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र०४/८३६/२०१७-१८,दि. २६/७/२०१७.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र०४/१०५३/२०१७-१८, दि. ३१/८/२०१७.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३०/६/२०१७.

प्रस्तावना -

अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये सन २०१७-१८ करिता इको टुरीझम राज्य योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत कोल्हापूर,पुणे, धुळे व औरंगाबाद या वनवृत्तातील पर्यटन स्थळांच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा चालू बाब प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शिफारशीसह सादर केला आहे.

शासन निर्णय दि. २८.०१.२०१६ अन्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधी नियमांना मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कार्यकारी समितीने प्रस्तावित सर्व पर्यटन स्थळाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे.

राज्य योजना सन २०१७-१८ करीता इको टुरीझम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेअंतर्गत रू.८०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. या निधीतून प्रस्तावित पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता .

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार कोल्हापूर,पुणे, धुळे व औरंगाबाद या वनवृत्तातील पुढील सात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी **रु.१६४.९४ लक्ष (एक कोटी चौसष्ठ लक्ष चौ-याण्णऊ हजार)** इतक्या रक्कमेस पुढीलप्रमाणे उद्दिष्ट निहाय खर्च करण्यास नमुद अटी व शर्तींचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	पर्यटन स्थळाचे नाव	०२ मजुरी	२१ पुरवठा व सामग्री	५० इतर खर्च	एकूण
१	श्री. गिरलिंग परिसर विकास योजना, कुकटोळी ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली	रु. ०.७७	रु. ०.३९	रु. ०.३९	रु. १.५५
२	मौजे जेजूरी खंडोबा देवस्थान ता, पुरंदर, जि. पुणे	रु. १८.४२	रु. ९.२०	रु. ९.२०	रु. ३६.८२
३	पिंपरखेड, जि, धुळे	रु. ३३.०७	रु. १६.५०	रु. १६.५०	रु. ६६.०७
४	ठाणेपाडा, जि. नंदुरबार	रु. ९.२६	रु. ४.६३	रु. ४.६३	रु. १८.५२
५	लांडोरखोरी, जि. जळगाव	रु. १७.२६	रु. ८.६२	रु. ८.६२	रु. ३४.५०
६	दौलताबाद वनउद्यान, औरंगाबाद	रु. २.३२	रु. १.१५	रु. १.१५	रु.४.६२
७	सारोळा निसर्ग पर्यटन केंद्र, औरंगाबाद	रु. १.४४	रु. ०.७१	रु. ०.७१	रु. २.८६
	एकूण	**रु. ८२.५४**	**रु. ४१.२०**	**रु. ४१.२०**	**रु.१६४.९४**

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये नमुद केलेली विकास कामे करण्यासाठी उपरोक्त निधी खर्ची टाकण्यात यावा.

२. शासन निर्णय संदर्भ क्र. ३ दि. १ डिसेंबर २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४.१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु. तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

३. उपरोक्त खर्च विहीत कार्यपद्धतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. प्रस्तावित कामातील बालोद्यान सुशोभीकरण, निरीक्षण मनोरा, माहिती फलक इ. कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्य (उदा.बांबू इ.) चा जास्तीत जास्त वापर करावा व त्या अनुषंगिकच निधी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.

५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे याची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करताना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/ उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुद्धा दक्षता घ्यावी.

६. शासन निर्णयात नमुद कामासाठी इतर स्त्रोतातुन निधी घेण्यात येणार नाही व कामाची द्विरुक्ती होणार नाही याचे प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणपत्रासोबत द्यावे त्याशिवाय पुढील निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च **रु.१६४.९४ लक्ष (एक कोटी चौसष्ठ लक्ष चौ-याण्णऊ हजार)** सन २०१७-१८ साठी मागणी क्र. सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३० जून २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२७१६३३०६२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.09.27 16:22:55 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर,पुणे, धुळे व औरंगाबाद
(५) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(६) जिल्हा कोषागार अधिकारी कोल्हापूर,पुणे, धुळे व औरंगाबाद
(७) कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(८) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(९) निवड नस्ती, फ-५.

शासन निर्णय क्रमांक :निसप-२०१७/ प्र.क्र. ११४ /फ- ५ दि. २७ सप्टेंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र

१. गिरलिंग परिसर विकास योजना

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) कोल्हापुर	गिरलींग परिसर विकास योजना कुकटोळी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली पंचम वर्ष कामे	१०	१.५५
		एकूण		**१.५५**

२. मौजे जेजूरी खंडोबा देवास्थान ता.पुरंदर जि.पुणे

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) पुणे	जल व मृद संधारण कामे संधारण कामे	८ नग.	२.८३
२		निसर्ग परिक्रमा पथ	४० मी.	२.९८
३		वनक्षेत्रात अंतर्गत रस्त्यावर माहिती फलक लावणे.	१८	२.७०
४		बोर्ड बसविणे ड्रिलिंगसह	१००	०.८७
५		भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे	१ नग.	०.५०
६		सौर दिवे बसविणे	१० नग.	२.००
७		झाडांना ओटे बांधणे	५ नग .	२.७८
८		बाकडी खरेदी	१०	१.५०
९		सुशोभिकरण संरक्षण देखभाल	--	८.२३
१०		हिरवळ देखभाल, पाणी	--	६.५२
११		पर्यटकांसाठी विश्रांती शेड बांधणे/पॅगोडा बांधणे	१ नग.	२.९२

१२		रेलींग करणे/सुसरतुंगी ते पोतेखिंड पेव्हींग रस्ता	२४ मी.	२.९९
		एकुण :-	--	**३६.८२**

३. पिंपरखेड जिल्हा धुळे .

(रक्कम लाखात)

अ.क्र.	**कार्यान्वीत यंत्रणा**	**कामाचा तपशिल**	**परिमाण**	**अंदाजपत्रकीय रक्कम**
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) धुळे	विखुरलेल्या स्वरुपात वृक्षलागवड करणे द्वितीय वर्ष	५००० रोपे	१३.७५
२		विखुरलेल्या स्वरुपात वृक्षलागवड करणे तृतीय वर्ष	५००० रोपे	५.११
३		माती बंधारे	५	१५.००
४		सिमेंट बधांरे-१	१	१४.९६
५		नैसर्गिक पायवाट तयार करणे	४ कि.मी.	१.००
६		नैसर्गिक ध्यान केंद्र	१	१.५०
७		तात्पुरते चहापाणी व भोजनगृह तयार करणे	१	२.००
८		आवश्यक त्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन टाकणे	१	२.७५
९		अस्तित्वात असलेल्या पाणवठे /वनतलाव खोलीकरण व गाळ काढणे	--	१०.००
		एकुण :-	--	६६.०७

४. ठाणेपाडा जिल्हा नंदुरबार.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) धुळे	प्रथम वर्ष बांबु रोपवन २०.०० हे. ठाणेपाडा-२ कक्ष क्र.१३८	२०.०० हे	२.७५
२		कॅक्टस गृह उभारणे, कॅक्टस लागवड जोपासना करणे	१	२.२४
३		बालउद्यान उभारणे	१	५.००
४		प्रसाधन गृह उभारणे.	१	२.००
५		विखुरलेल्या स्वरुपात वृक्ष लागवड करणे	--	०.३३
६		संगणक , प्रोजेक्ट , स्लाईड शो , कॅमेरा, दुर्बिण इ. निसर्ग शिक्षण केंद्रासाठी खरेदी करणे पडद्यासह	--	५.००
७		प्रदूषण विरहीत पर्यटन गतीदेण्यासाठी सायकली खरेदी ३ महिला सायकली, ३ किशोर मुलांसाठी सायकली खरेदी	--	०.३०
८		निसर्ग प्रशिक्षण केंदासाठी ७५ प्लॅस्टीक खुर्च्या आणि २ टेबल खरेदी करणे.	--	०.७०
९		पक्ष्याच्या अधिवासा साठी कृत्रिम घरटी तयार करणे.	--	०.२०
		एकुण :-	--	१८.५२

५.लांडोरखोरी जिल्हा जळगाव.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) धुळे	Road work (Jogging track)	१	१.००
२		Amphi Theatre	१	१.००
३		बांबू सेटम (बांबू प्रजाती समूह) तयार करणे	--	१.००
४		वनउद्यानात लाईटींग करणे	--	०.५०
५		स्वयंपाक गृह बांधणे	१	३.००
६		फ्रूट गार्डन तयार करणे	१	०.५०
७		रोझ गार्डन तयार करणे	१	०.५०
८		पॅगोडा बांधणे-१	१	४.००
९		चेक डॅम तयार करणे	--	८.००
१०		ड्रेन दुरुस्त करणे	--	४.००
११		लॉन तयार करणे	--	१.००
१२		संरक्षक मजुर -२ (दिवय व रात्रपाळीसाठी)	--	१०.००
		एकुण	**--**	**३४.५०**

६.दौलताबाद वनउद्यान ,औरंगाबाद .

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद	दौलताबाद वनउद्यानात निर्सग पाऊलवाटेच्या दुतर्फा लहान/मध्यम/आकाराच्या २००० रोपांची लागवड करणे.	१.००	४.१२

२		वनउद्यानाची साफसफाई करणे,गवत काढणे, बांबू काढणे, बालोउद्यानमध्ये मुरुम टाकूण पसरविणे, वाळलेल्या झाडाच्या फांद्या छाटणे, सिमेंट बेंच दुरुस्ती करणे, विहीरी भोवती साफ-सफाई करणे, बारुदखाना साफ-सफाई करणे, झाडांना गेरु चूना लावणे.	१.००	**०.५०**
		एकुण :-	--	४.६२

७.सरोळा निर्सग पर्यटन केंद्र, वन विभाग, औरंगाबाद.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	**कार्यान्वीत यंत्रणा**	**कामाचा तपशिल**	**परिमाण**	**अंदाजपत्रकीय रक्कम**
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद	बांबू रोपवन घेणे १७ हे- द्वितीय वर्ष	१७.००	१.४०
२		गवत रोपवन दुतर्फ द्वितीय वर्ष	१३.००	**०.६७.**
३		मिश्र रोपवन १० हे. द्वितीय वर्ष	१०.००	०.७९
		एकुण :-	**--**	**२.८६**